1) म. टा. पू. पान क्र. 1

दि. 10/11/2022

2) पुढारी पू. पान क्र. 2

# सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

म. टा. वृत्तसेवा, वसई

विरारमधील कमलाबेन गुलाबचंद शाह या ज्येष्ठ महिलेचा मृत्यू हा गटारातच्या पाण्यात पडून झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले आहे. मात्र या प्रकरणी विरार पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. महिलेचा मृत्यू हा पालिकेच्या निष्काळजीमुळे झाला असून या प्रकरणी चौकशी करून दोषी महापालिका अधिकारी व कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

गटाराचे झाकण बंद असते, तर ही दुर्घटना घडली नसती, असा सूर वसई-विरारमध्ये उमटत आहे. उघड्या गटारांत, नाल्यात पडल्याच्या घटना दरवर्षी घडत असतात. त्यामुळे परिसरातील सर्व गटारांच्या झाकणांची तपासणी करून तुटलली झाकणे विनाविलंब दुरुस्त करावीत वा नवीन बसवावीत, असे आदेश विभागातील अभियंत्यांना देण्यात यावेत, अशी मागणी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी पालिकेकडे केली होती.

## गटारात पडून महिलेचा मृत्यू झाल्याने संताप

मात्र पालिका क्षेत्रात आजही अनेक उघडी गटारे अपघातांना निमंत्रण देत आहेत. याच कारणामुळे विरारच्या एमबी इस्टेटमधील एका महिलेला जीव गेल्याचा आरोप बारोट यांनी केला आहे. या घटनेची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच दोषी आढळणारे महापालिका अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी बारोट यांनी मिरा-भाईंदर वसई-विरारचे पोलिस आयुक्त सदानंद दाते यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

# नालासोपारा येथे वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिलेला अटक

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

नालासोपारा येथे एका हायफाय इमारतीमधील फ्लॅटमध्ये महिला दलाल सेक्स रॅकेट चालवत होती. वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिलेला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई करून अटक केली आहे. तिच्या ताब्यातून दोन पीडित मुलींची सुटका केली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष नालासोपारा पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना माहिती मिळाली की, बँक ऑफ बडोदा, जूचंद्र स्टेशन रोड, नायगाव , रिलायबल गार्डन इमारतीमधील एका फ्लॅटमध्ये एक महिला वेश्याव्यवसाय चालवत आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलीस पथकाने सापळा रचून छापा टाकून एका महिलेला ताब्यात घेतले आणि वेश्याव्यवसायाच्या तावडीतून २ पीडित मुलींची सुटका केली.

ही महिला गेल्या अनेक महिन्यांपासून महिला वेश्या व्यवसाय चालवत आहे. महिलेवर विविध कलमांखाली पिटा कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

२ पीडित मुलींना महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. हायफाय इमारतीमध्ये सुरू असलेला वेश्याव्यवसायाचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि गुन्हे शाखेचे अमोल मांडवे , अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष नालासोपाराचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

3) पुण्यनगरी पान क्र. 3

# थेट पोस्टिंगला शिंदे-फडणवीस सरकारचा लाल शेरा

**▌गृह विभागात नवा पायंडा; वरिष्ठांना न जुमानणाऱ्यांना चाप; आयुक्तांकडून नेमणुकीचा मार्ग मोकळा**

▌श्रीकांत साबळे

**पुणे :** पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या डीसीपी, अतिरिक्त पोलीस आयुक्त या क्रमांक तीनच्या पोस्टिंग करत असताना थेट पोस्टिंग मिळवित वरिष्ठांना न जुमानणाऱ्या अधिकाऱ्यांना शिंदे-फडणवीस सरकारने काहीशी वेसण घेतल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी जवळपास १०० हून अधिक अधीक्षक, उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. मात्र, त्यात आयुक्तालयात नेमणूक करत असताना फक्त 'उपायुक्त...' असाच उल्लेख केला गेल्याने आता आयुक्तांना नेमणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर असताना दोन वर्षांपूर्वी ज्या अधीक्षक आणि उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या गेल्या होत्या, त्या बदल्यांमध्ये आयुक्तालयांतर्गत पोस्टिंग करत असताना थेट झोन १, झोन २, वाहतूक शाखा अशा प्रकारचा उल्लेख बदली ऑर्डरमध्ये करण्यात आला होता. या पोस्टिंग झाल्यानंतर यावर बराच गदारोळही उडाला होता. बदल्या करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये अनेक अधिकाऱ्यांचा पूर्वइतिहास न पाहताही मोक्याच्या ठिकाणी नेमणूक करण्यात आल्याची चर्चा खात्यांतर्गत रंगली होती. वरिष्ठ पातळीवरूनच थेट झोनचे वाटप करून ऑर्डर काढण्यात आल्यामुळे त्या-त्या शहराची जबाबदारी सांभाळणाऱ्या आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांचेही हात बांधले गेले होते. तर, दुसरीकडे कामावर हजर झाल्यानंतर काही अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात चुकीची कामे होत होती. तसेच जनसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दल नाराजीचा सूर उमटत असतानाही थेट पोस्टिंगमुळे आयुक्तांचे हात बांधले गेले होते. तत्कालीन सरकारच्या या निर्णयामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्येही नाराजीचा सूर उमटत होता. या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी शिंदे-फडणवीस सरकारने १०० हून अधिक अधीक्षक आणि उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून, आयुक्तालयांतर्गत नेमणुका करत असताना फक्त आयुक्तालयाचा उल्लेख बदली ऑर्डरमध्ये करण्यात आला आहे. यावरून बदली ठिकाणी रुजू झाल्यानंतर संबंधित उपायुक्त यांना आयुक्तांकडे पहिल्यांदा हजेरी लावावी लागणार आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या या नव्या निर्णयामुळे येणाऱ्या काळात चांगल्या अधिकाऱ्यांची मात्र चांदी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## पुण्यात झाली होती डोकेदुखी...

पुणे शहरात मावळत्या सरकारने वाहतूक तसेच काही झोनमध्ये थेट उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या होत्या. कामावर रुजू झाल्यानंतर संबंधित अधिकारी चांगले काम करतील असे वाटत असतानाच यातील काही अधिकाऱ्यांनी आयुक्तांना विश्वासात न घेत थेट नेमणुकीचा फायदा उठवत चुकीचे निर्णय घेतले होते. संबंधित अधिकाऱ्याच्या चुकीमुळे थेट आयुक्तांना राजकीय तसेच सामाजिक घटकांकडून टीकेचा सामना करावा लागला होता. आता नव्या निर्णयामुळे आयुक्तांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

4) लोकमत पान क्र. 2

दि. 10/11/2022

# वीट मारून हत्या केली, कांगावा केला भिंत पडल्याचा!

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगावच्या वाकीपाडा परिसरात राहणाऱ्या २८ वर्षीय मित्राची २४ वर्षीय आरोपी मित्राने डोक्यात वीट मारून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपी मित्राने मित्राच्या अंगावर भिंत पडल्याने जखमी झाल्याचा बनाव केला होता. पण डॉक्टर व वालीव पोलिसांनी हा बनावाचा डाव उधळून लावून हत्या करणाऱ्या आरोपी मित्राला अटक करून गुन्ह्याचा छडा लावला आहे.

वाकीपाडा येथील दत्त मंदिरसमोर राहणारा विमलेशकुमार पाठक (२८) याला त्याच परिसरात राहणाऱ्या आरोपी मित्र विक्रम प्रजापती (२४) याने सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास चाळीतील शेवटच्या मोकळ्या रूममध्ये पार्टी करण्यासाठी घेऊन गेला. दारू पिऊन दोघांमध्ये कोणत्यातरी कारणावरून वाद झाल्याने आरोपीने विमलेशच्या डोक्यात, तोंडावर वीट व ठोसेबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपीने विमलेशची पत्नी हेमा पाठक (२२) हिला रूममधील भिंत विमलेशच्या अंगावर पडल्याने दुखापत झाल्याचे सांगून जुचंद्र येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले. पण विमलेशची स्थिती नाजूक असल्याने त्याला उपचारासाठी तेथील डॉक्टरांनी दुसरीकडे नेण्यास सांगितले.

वालीव पोलिसांनी एमएलसीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करून गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात केली. ही हत्या पैशांच्या वादातून झाल्याचा पोलिसांना संशय आला. वालीव पोलिसांनी आरोपीला परिसरातून अटक करून चौकशी केल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

**▪ वसईच्या सर डी. एम. पेटीट मनपा रुग्णालयात विमलेशला आणल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पण विमलेशच्या डोक्यावरील आणि चेहऱ्यावरील जखमा पाहून भिंत अंगावर पडल्यामुळे त्या झाल्या नसल्याचा अभिप्राय डॉक्टरांनी दिला. त्यानंतर आरोपी रुग्णालयातून पळून गेला.**

5) लोकमत पू. पान क्र. 3

# वाहतूक पोलिसांना रिफ्लेक्टर जॅकेटचा विसर

लोकमत न्यूज नेटवर्क

भाईंदर : रस्ते अपघातापासून बचावासाठी दिलेल्या रिफ्लेक्टर जॅकेटचा मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील काशिमीरा वाहतूक विभागातील अंमलदारांना विसर पडला आहे.

वाहतूक नियंत्रण व नियमन करत असताना वाहन चालकांना रस्त्यावर उभे असलेले पोलीस अंमलदार न दिसल्यामुळे अपघाताची शक्यता असते. भारतात दरवर्षी २० पोलीस रस्ते अपघातात आपला जीव गमावत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसोबतच वाहतूक नियमन करणाऱ्या पोलीस अंमलदारांचे संरक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. चांगल्या दर्जाचे रिफ्लेक्टर जॅकेट परिधान केल्यास अंधारातही गाड्यांच्या दिव्याच्या प्रकाशात रेडियममुळे जॅकेट चमकते. त्यामुळे वाहनचालकांना पुढील कोणी व्यक्ती उभी असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे पोलिसांच्या संरक्षणाच्या उद्देशाने ऑक्टोबरमध्ये वाहतूक पोलिसांना १०० जॅकेट व ५० हेल्मेटचे वाटप केले होते. मात्र, तरीही वाहतूक पोलीस कर्तव्य बजावताना नियमितपणे रिफ्लेक्टर जॅकेटचा वापर करीत नसल्याचे दिसून येत आहे.

याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक (वाहतूक) रमेश भामे यांना विचारले असता त्यांनी वाहतूक पोलिसांना नियमितपणे रिफ्लेक्टर जॅकेट वापरण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले.

6) पुढारी पू. पान क्र. 3

# महिलांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यांचा विरारमध्ये निषेध



नालासोपारा : महिलांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वसईविरार महिला अध्यक्ष गीता जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांनी एकत्रित येवून बेताल वक्तव्याचा विरार मधील मनवेलपाडा तलाव येथे संयुक्तरित्या निषेध करण्यात आला.

याप्रसंगी वसईविरारवंचित बहुजन महिला आघाडी अध्यक्ष गीता जाधव, मनीष लांजेवार, प्रफुल्ल हळदे, सुविध पवार, आशा ठाकूर, सुरेखाताई मोरे, स्वीटी येलवे, गौतमी कांबळे, उत्तम जाधव, अनिकेत मोहिते, सनी कांबळे, विश्वनाथ जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गिरीश दिवानजी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महेश राऊत, प्रवीण जाधव, मनोज रूके, बिपीन रूके, महेश हांदे, आयुब माझगवकर, राहुल कदम, यश प्रभू अनिल इंगळे आदि मान्यवर उपस्थित होते.

ज्या प्रकारे संभाजी भिडे यांनी एक पत्रकार महिलेस कुंकू लावून ये मग तुझ्याशी बोलतो असे महिलांचे स्वतंत्र हिरावून घेणारे भाष्य केले. तसेच गुलाबराव पाटील ह्यांनी सुषमा अंधारे ह्यांचा अश्लिल शेरबाजी करून अवमान केला. तर अब्दुल सत्तार ह्यांनी सुप्रिया सुळे ह्यांना घाणेरड्या भाषेचा वापर केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात स्त्रियांना खुलेआम आवमान सहन करावा लागत आहे. राजकीयनेता सत्ता धारी असून कायद्याची पर्वा करत नसेल तर आपला महाराष्ट्र कोणत्या दिशेला जात आहे हे आपल्याला समजत असेल. ह्यांना वेळीच अडवले पाहिजे म्हणून सर्व संघटना मिळून एकत्र येऊन मनवेलपाडा येथे निषेध व्यक्त केला.

७) लोकसत्ता पू. पान क्र. 4 दि. 10/11/2022

# अल्पवयीन वाहनचालकांत वाढ

## दोन हजारांहून अधिक जणांवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई-विरार शहरात नियमांचे उल्लंघन करून वाहने चालविणाऱ्या अल्पवयीन वाहनचालकांच्या विरोधात ही वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू आहे. यंदाच्या चालू वर्षात दोन हजारांहून अधिक अल्पवयीन वाहनचालकांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे.

कोणत्याही व्यक्तीला अठरा वर्षे पूर्ण झाल्याशिवाय वाहन चालविण्याचा परवाना दिला जात नाही तरीहीसुद्धा नियमांचे उल्लंघन करून अल्पवयीन मुलं मुली यांच्या हातात पालकांकडून वाहने दिली जात आहेत.

वसई विरार शहरात ही अल्पवयीन वाहनचालकांचे प्रमाण वाढत आहे. विशेषतः शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी वाहने शाळेत घेऊन जात असतात.

अनेकदा पालक आपला मुलगा दहावी बारावी उत्तीर्ण किंवा वाढदिवस आपल्या मुलांना दुचाकी भेट दिली जाते. तर काही वेळा काही अल्पवयीन मुलं ही स्वतःहून अतिउत्साहाच्या भरात वाहने हातात घेऊन चालविण्याचा प्रयत्न करतात. परंतु वाहतूक नियमांच्या संदर्भात माहिती नसल्याने अपघातासारख्या घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच काही अल्पवयीन वाहनचालक हे मोबाईलवर बोलणे, रस्त्याच्या विरुद्ध दिशेने वाहने चालविणे, अतिवेगाने व निष्काळजीपणे वाहने चालविणे, स्टंट बाजी करणे, ट्रिपल सीट वाहने चालविणे असे प्रकार सरार्स होत आहेत.

त्यावेळी हे वाहनचालक स्वतः चा व इतर वाहनचालक यांचाही जीव धोक्यात घालत असतात. काही वेळा अपघाताच्या घटना ही घडतात.

अशा प्रकारे अल्पवयीन वाहनचालक वाहने चालवीत असतात त्यांच्या विरोधात वसई विरार वाहतूक पोलिसांमार्फत कारवाई सुरूच असते. वसई विरार या दोन्ही विभागांत यंदाच्या चालू वर्षात जानेवारी ते ऑक्टोबर या दरम्यान २ हजार ७० अल्पवयीन वाहनचालकांच्या विरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई करून ४ लाख १४ हजार रुपये इतका दंड आकारणी केली आहे, अशी माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.

अल्पवयीन वाहनचालकांच्या हातात वाहने देणे कायद्याने गुन्हा आहे. वयाची वर्षे पूर्ण होऊनच त्यांच्या हाती वाहने दिली पाहिजे असे वसई वाहतूक पोलिसांनी सांगितले आहे.

### वाहतूक पोलिसांचे आवाहन

अल्पवयीन पाल्य वाहन चालविते याचे पालकांनी कौतुक करू नये, कायद्याने बेकायदेशीर आहे, पाल्यासाठी पाच हजार आणि वाहन मालकासाठी पाच असा दहा हजारांचा दंड आकारणी होऊ शकतो. कारवाईमध्ये दंड भरला म्हणजे सगळं झालं असं बिलकूल नाही, रस्ते अपघातांमध्ये आपण आपले अल्पवयीन पाल्य गमावले जाण्याची किंवा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण आणि आपले पाल्य यांचा जीव महत्त्वाचा आहे. बालवयापासून आपल्या पाल्याला वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करण्याचा सल्ला द्यावा असे आवाहन विरार वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम करांडे यांनी केले आहे.

८) लोकसत्ता पू. पान क्र. 3

# गटारांवरील झाकणे चोरणारी टोळी सक्रिय

## मीरा-भाईंदर पालिकेची पोलिसात तक्रार

**लोकसत्ता, वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरात पालिकेने गटारांवर लावलेली झाकणे चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे. नागरी वस्ती असलेल्या भागात गटारावरील झाकणे गायब होत आहेत. त्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याप्रकरणी पालिकेने पोलिसात तक्रारी केल्या आहेत.

मीरा-भाईंदर पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहरातील संपूर्ण रस्त्याची निर्मिती आणि देखभाल व दुरुस्तीची कामे केली जातात. उघडया गटारात पडून दुर्घटनेची शक्यता असल्याने पालिकेकडून वेळोवेळी गटारावरील झाकणे बसवण्याच्या कामाला अधिक प्राधान्य दिले जाते. पालिका अर्थसंकल्पात शहरातील गटारावरील झाकणाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, गटारांवरील झाकणे चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. ही झाकणे बसवली जात असताना आता झाकण चोरण्याची नवी समस्या निर्माण झाली आहे.

शहरातील गटारांवर असलेली लोखंडी आणि सिमेंटची झाकणे चोरण्यात येत आहेत. शहरातील अनेक गटारांवर बसवलेली नवी झाकणे चोरण्यात आली आहेत. सिमेंटची झाकणे २ ते ४ हजारांना तर लोखंडी झाकणे ८ हजारांपासून १० हजार रुपये किमतीची आहेत. त्यामुळे भुरटे चोर ही झाकणे चोरत असतात. शहरातील शीतल नगर, शांती पार्क, बेव्हर्ली पार्क आणि काशीनगर परिसरात गटारावरील झाकणे गायब झाली आहेत.

### 'पण झाकणे बसवा'

आम्ही नियमितपणे उघड्या गटारांवर झाकणे बसवत असतो. मात्र, झाकणे बसवण्यात आल्यानंतर ती चोरीला जात असल्याचे पालिकेने सांगितले आहे. या झाकणे चोरी संदर्भात पालिकेने पोलीस ठाण्यात तक्रारीही दिल्या असल्याची माहिती पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिली आहे. तर झाकणे चोरीला जात असली तरी गटारे उघडी राहून नयेत, पालिकेनी ती तात्काळ बसवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता सज्जी आय पी यांनी केली आहे.

१) पुण्यनगरी पू. पान क्र. 4

दि. 10/11/2022

# मनसेचा नालासोपाऱ्यात थिएटर मालकाला दणका



**। नालासोपारा :** येथील पश्चिमेकडील फन फिएस्टाच्या मिराज सिनेमा गृहाने हरहर महादेव चित्रपट बंद केल्याने संतप्त झालेल्या मनसेचे नालासोपारा शहर अध्यक्ष श्रीधर ऊर्फ रवी पाटेकर यांनी निवडक मावळ्यासह फन फिएस्टाच्या मिराज सिनेमागृहावर चाल करून बंद केलेला 'हर हर महादेव' चित्रपट पुन्हा सुरू केला. थिएटर मालकाला मनसेने दणका दिल्याने ही चर्चा शहरात दिवसभर रंगली होती.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हर हर महादेव' चित्रपटाचा शो ठाण्यात माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी उधळून लावल्यानंतर नालासोपारा मिराज सिनेमाने नसती आफत नको म्हणून 'हर हर महादेव' चित्रपटाचा शो लावला नव्हता. वसई-विरारमध्ये शो सुरू असताना नालासोपाऱ्यात मात्र बंद केल्याने मनसेचे नालासोपारा शहरप्रमुख रवी पाटेकर यांनी चित्रपटगृहाच्या प्रशासनाला धारेवर धरत जर तुम्ही 'हर हर महादेव' चित्रपट सुरू केला नाहीतर आम्ही चित्रपटगृहात एकही चित्रपट चालू देणार नाही. जर शासनाने बंदी आणली तर आमची हरकत नसल्याचे त्यांनी प्रशासनाला सांगितले. यावेळी वाहतूक सेना जिल्हा अध्यक्ष विनोद मोरे, विश्राम मोंडे, दिलीप नेवाळे, कल्पेश रायकर, सैनिक मांगले, दर्शना पाटील, पांडुरंग लोखंडे, रोहित आंबवकर, सुभाष नागप, सुभाष जाधव, विकास कानडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सेन्सॉर बोर्डाने मान्यता दिल्यानंतर मराठी चित्रपटाला स्थान न देणाऱ्या चित्रपटगृहांना मनसेने या आधीसुद्धा दणका दिला होता. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः तिकीट काढून आम्हाला सिनेमा बघायचा आहे. तुम्ही इतर चित्रपटगृहांप्रमाणे ऑनलाइन तिकीट विक्री सुरू करा, असे सांगितले आणि प्रशासनाला फक्त २० ते २५ लोकांसाठी चित्रपट सुरू करावा लागला.